**<u>नियमित दिवाणी दावा क्रं.३६/२०१५</u>**
**<u>निशाणी क्रं. ३५ लगत</u>**

**<u>प्रतिवादी क्रमांक ९ करीता उलटतपास अधिवक्ता श्री. बी. व्ही. पाटील यांचेमार्फत</u>**
**<u>शपथेवर सुरू</u> :–**

१. वंदना हीला दोन बहिणी आणि तीन भाऊ आहेत. त्यांची नावे मला सांगता येतील. त्यांची नावे बाबु, बालु, योगेश, वंदना व सोजर अशी आहेत. यांपैकी बालू व योगेश मयत आहेत. बालुला एक बायको होती. ती कुठे आहे हे मला माहीत नाही. नागशेट्टी बिरादारच्या जमीनीचा सर्वे नं. ४१ आहे. त्यांचे गावामध्ये घर आहे. बालाजी, बाबू आणि योगेश यांनी वर्ष १९९७ मध्ये वाटण्या केल्या होत्या. त्याअधारे उदगीर येथील न्यायालयामधुन हूकूमनामे प्राप्त केले होते हे मला माहीत नाही. त्याअधारे ७/१२ उता–यामध्ये त्यांची नावे लागली होती हे मला माहीत नाही.

२. बालूच्या बायकोचे नाव मला आठवत नाही. बाबू हा शेतातील पिकाचा हिस्सा वादीला देत होता याबाबत मी कागद बघीतलेला नाही. वादजमीन एकत्रीत कुटूंबाची असल्याबाबत माझ्याकडे कागद नाही. हे म्हणणे खरे नाही की, वंदनाच्या सांगण्यावरुन मी खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे. माझ्या साक्षीशपथपत्रामध्ये काय लिहीले हे माझ्या लक्षात नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )

दि. २७/११/२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **<u>देवणी</u>**.